# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**गारगोटी (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) शहरात स्वतंत्र अग्निशमन दल यंत्रणा उभारण्याबाबत**

**(१) १२२८२ (०८-०३-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारगोटी (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) शहरात अद्याप स्वतंत्र अग्निशमन दल यंत्रणा कार्यरत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्याकरिता अग्निशमन यंत्रणा नसण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या ठिकाणी तातडीने अग्निशमन यंत्रणा उभारण्याकरिता शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०४-२०१७) :** (१), (२) व (३) राज्याच्या अग्निशमन सेवा सक्षमीकरणासाठी व बळकटीकरणासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. राज्यात राज्यस्तरीय अग्निशमन सेवा नसल्यामुळे ही सेवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्यामार्फत पुरविण्यात येते. सद्य:स्थितीत राज्यातील तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपालिका/नगरपंचायती स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. यामध्ये गारगोटी (भुदरगड) या तालुका मुख्यालयाचा देखील समावेश असून नगरविकास विभागास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. याबाबतची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान ही योजना या तालुक्यांना लागू करण्याचा विचार करण्यात येत आहे.

---

**यवतमाळ जिल्हा परिषद अधिकाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानांचे सेवा शुल्क थकीत असल्याबाबत**

**(२) १३७२७ (०८-०४-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवमाळ जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना नाममात्र शुल्कात शासकीय वसाहतीतील घर उपलब्ध करुन दिले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अभियंता, गट विकास अधिकारी अशा प्रथम वर्गाच्या अधिकाऱ्यांनीच शासकीय निवासस्थानांचे सेवा शुल्क थकविले आहे, या सेवा शुल्काच्या वसुलीची जबाबदारी जिल्हा परिषद बांधकाम विभागातीलच लिपिकावर असल्यामुळे दबावाखाली वसुली होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी थेट वेतनातून शासकीय निवासस्थांचे सेवा शुल्क रक्कम कपात करावी असे आदेश देऊनही पंचायत विभागाचे अधिकारी आपले उत्तरदायित्व पार पाडत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०४-२०१७) :** (१) नाही

(२) चार अधिकाऱ्यांकडून चटई क्षेत्रफळानुसार सेवा शुल्काची आकारणी थकित होती. तथापि, या चारही अधिकाऱ्यांनी सेवा शुल्काची रक्कम जिल्हा निधीत जमा केलेली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत कोणाकडेही सेवाशुल्क थकित नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुलंब्री (जि.औरंगाबाद) येथे जलसंधारणाच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(३) १८०८६ (१७-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) येथील उपअभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) उपविभाग, औरंगाबाद यंत्रणेच्या कामासाठी रोजगार हमी योजनेअतंर्गत कुशल भागाच्या खर्चासाठी औरंगाबाद विभागास प्राप्त झालेल्या निधितून कामाची अंमलबजावणी करणाऱ्या शाखा अभियंता तसेच तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी संगनमत करुन करोडो रुपयांचा परस्पर गैरव्यवहार केला असल्याची तक्रार दिनांक ८ जानेवारी, २०१३ रोजी अधिक्षक अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद यांचेकडे दाखल करण्यात आल्यानंतर याप्रकरणी चौकशी करुन सविस्तर व वस्तुनिष्ठ अहवाल दस्तऐवजासह अधिक्षक अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) यांनी दिनांक १८ जानेवारी, २०१३ रोजी तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने आतापर्यंत शाखा अभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०६-२०१७) :** (१) प्रस्तुत प्रकरणी चौकशी अहवाल दिनांक १-३-२०१४ रोजी अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद यांचेकडे प्राप्त झाला आहे हे खरे आहे.
(२) व (३) चौकशी अंती तक्रारीत कुठल्याही प्रकारचे तत्थ्य आढळले नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(४) ३०२५३ (२२-०१-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील बनावट कामगारांची बनावट बँक खाती दाखवून अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गंगापूर (जि.नाशिक) धरणाजवळील मेगा पर्यटन संकुलातील**
**बोट क्लब कार्यान्वित नसल्याबाबत**

**(५) ४०७९५ (२०-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.नाशिक) धरणाजवळील मेगा पर्यटन संकुलातील जागतिक दर्जाच्या बोट क्लबची इमारत गत दिड वर्षांपासून पूर्ण होवूनही माहे जानेवारी २०१६ पर्यंत कार्यान्वित करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पर्यटन संकुलातील कन्व्हेन्शन सेंटरसाठी निधी मंजूर असूनही सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याने सदर प्रकल्पाचे काम माहे जानेवारी, २०१६ पर्यंत करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :** (१) सदर बोट क्लब पूर्ण होऊन तयार करण्यात आलेला आहे व त्यासाठी लागणाऱ्या बोटी खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्याबाबत काही पर्यावरणवादी संघटनांनी विरोध केल्यामुळे कार्यवाही प्रलंबित होती. त्यानंतरच्या काळात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने पर्यावरण विभागाची परवानगी घेऊन काही बोटी चालविण्यास मान्यता प्राप्त केली व त्यासंदर्भातील त्या बोटी चालविण्याची निविदा काढण्यात आली. प्राप्त निविदेच्या प्रक्रियेबाबत तक्रार प्राप्त झाल्याने चौकशी चालू आहे.

(२) व (३) गंगापूर येथील कन्व्हेन्शन सेंटरसाठी सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्याबाबत अधिकची माहिती मागविण्यात आली आहे. ती प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जवाहर रोजगार योजनेतून घेण्यात येणाऱ्या विहिरीच्या काही जाचक अटी रद्द करण्याबाबत

**(६) ४२४८३ (२१-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सुरु केलेल्या जवाहर रोजगार योजनेतून घेण्यात येणाऱ्या विहिरीच्या काही जाचक अटी (६० आर क्षेत्र अट रद्द करुन १ ते २ आर क्षेत्रास परवानगी द्‌यावी व दोन्ही विहिरीचे अंतर ५०० फूट रद्द व्हावी) रद्द करण्यात यावी तसेच मस्टर व जॉब कार्ड बंद करुन शाखा अभियंता यांना मोजमाप करुन शेतकऱ्यांच्या नावे देयक मिळण्यात यावे अशी मागणी शेतकरी वर्गातून होत असल्याची माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०६-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यात केंद्र शासनाने अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विहीरीसाठी अनुदान मंजूर करुनही विहीरींचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(७) ४५२३६ (०३-०५-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील वसई पंचायत समितीने सन १९९२ ते २००८-०९ या वर्षात लेखापरीक्षण अहवालामध्ये ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेतीच्या पाण्यासाठी केंद्र शासनाच्या जवाहर विहीर योतनेतून ४८२ विहीरी बांधल्याचे दाखवून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झालेला असून त्याची चौकशी करण्याची मागणी पंचायत समिती (वसई) सभापतींनी केली असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखा परिक्षण अहवालानंतर यातील केवळ ७० विहीरी जागेवर असल्याचे निरिक्षणात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाद्वारे प्रत्येक विहीर खोदाईला ७० हजार रुपयाचे अनुदान ३ टप्प्यात देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०६-२०१७) :** (१), (२) व (३) नाही. वसई (जि.पालघर) तालुक्यातील सन १९९२-९३ ते २००८-०९ या कालावधीत राज्य रोहयोअंतर्गत एकूण ४८२ जवाहर विहीरी मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यासाठी रु.१,७३,१७,५४५/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले होते. मंजूर ४८२ विहीरींपैकी ३६१ जवाहर विहीरी पूर्ण झाल्या असून सदर विहीरींकरीता रु.१,४६,४७,९८०/- इतक्या अनुदानाचे वाटप करण्यात आले असून १२१ विहीरी रद्द करण्यात आल्या आहेत.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील सुर्यानगर येथील कामगार वसाहत कॉलनी बांधकाम तोडले जात असल्याबाबत**

**(८) ५१२६८ (०७-०५-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील कासा सुर्यानगर येथील कामगार वसाहत कॉलनी बांधकाम तोडले जात असून शासनाच्या मालमत्तेची विक्री केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उपरोक्त मालमत्तेच्या विक्रीतील फक्त २.५ कोटी तिजोरीत जमा झाले असून, उर्वरित रक्कम जमा केली जाणार आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

जलसंपदा विभागाच्या सूर्या प्रकल्पावर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानासाठी व कार्यालयासाठी सन १९७७ मध्ये सूर्यानगर वसाहतीतील तात्पुरत्या इमारतींचे बांधकाम करण्यात आले होते. सदर इमारती सततच्या अति पावसाच्या माऱ्याने तसेच वापरात नसल्याने व भविष्यात उपयुक्तता नसल्याने देखभाल दुरुस्तीअभावी मोठ्या प्रमाणावर क्षतिग्रस्त झालेल्या होत्या. परिणाम स्वरुप, राहण्यास अयोग्य व धोकादायक असणाऱ्या इमारतीचा आढावा घेवून निर्लेखन प्रस्तावास सक्षम स्तरावर मान्यता घेवून विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन निर्लेखित निकामी साहित्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सूर्या प्रकल्प वसाहतीतील निकामी / धोकादायक इमारती तोडण्याचा व जागा साफसफाई करण्याचा खर्च वजा जाता प्राप्त भंगार साहीत्य विक्री पोटी मुल्याधारीत करासह रु.७७,६२६.०० इतकी रक्कम शासन खाती जमा झालेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भरणे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याची झालेली दुरवस्था

**(९) ५४२२८ (२४-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भरणे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील जगबुडी नदीपूलाजवळ १९७४ मध्ये बांधण्यात आलेल्या १२६ मीटर लांबीचा कोल्हापूरी पध्दतीच्या बंधारा बांधून नातूवाडी धरणातून सोडण्यात येणारे पाणी 'भरणे' जॅकवेलमध्ये सोडल्यानंतर खेड शहराला वितरीत करून शहरातील पाणी टंचाई कमी करण्यासाठी सदरहू बंधाऱ्यांची योजना राबविण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बंधाऱ्याची दुरवस्था झाली असून सततच्या गतीमुळे पाण्याचाही अपव्यय होत आहे, इतकेच नव्हेतर ३७ स्तंभ ३८८ गाळे असलेला हा बंधारा नुसता नावापुरताच राहिला असून सदरहू बंधाऱ्यांची त्वरीत पुर्नबांधणी करावी म्हणून त्या परिसरातील भरणे, सोखीवली, वेरला, संवेणी, ऐनवरे आदी गावातील ग्रामस्थांनी तसेच शेतकऱ्यांनी कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण पाटबंधारे विभाग, मा.पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा, मा. जलसंपदा मंत्री, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग आदींकडे मागील ३ वर्षापासून सातत्याने मागणी केल्यानंतर सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात सदरहू भरणे बंधाऱ्यांच्या

पुर्नबांधणीसाठी १ कोटी ७५ हजाराची तरतूद केलेली असतानाही आजमितीस सदरहू बंधाऱ्यांच्या पुर्नबांधणीचे काम सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, अद्यापी सदरहू बंधाऱ्यांच्या पुर्नबांधणीचे काम सुरु न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत

(४) असल्यास, सदरहू बंधाऱ्यांच्या पुर्नबांधणीचे काम विनाविलंब पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०४-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर बंधारा मुख्यत्वे करुन सिंचनाकरीता पाणी पुरवठा करण्यासाठी बांधण्यात आला आहे. तथापि, सदर बंधाऱ्यातून खेड शहराला प्रत्यक्षात पिण्यासाठी पाणी पुरवठा देखील करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) भरणे बंधारा नादुरुस्त झाला असून नव्याने संधानकात बांधण्याच्या अंदाजपत्रकास शासनाने दि.१७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये रु.१७५.६९ लक्षला प्रशासकीय मान्यता दिली असून सक्षम अधिकाऱ्याने अद्यावत दरसूची नुसार रु.१७९.६५ लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

सदर बंधाऱ्याच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यासाठी निविदा मंजूरीबाबत ची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु असून निविदा कार्यवाही पूर्ण करुन बंधारा दुरुस्तीची कामे हाती घेण्याचे नियोजित आहे.

---

**महाराष्ट्राचे पाणी गुजरातला न देण्याच्या शिफारशीबाबत**

**(१०) ६५०६३ (०२-०१-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमणगंगा नार-पार नद्यांच्या जल नियोजनाबाबत शासनाने नेमलेल्या तज्ञ समितीचा अहवाल दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास जलसंपदा विभागास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात नार-पार खोऱ्यातून गुजरातला देण्यास काहीच पाणी शिल्लक राहत नसल्याची शिफारस सदर अहवालात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तरीसुध्दा नार-पार खोऱ्यातील २९ टीएमसी पाण्यापैकी २१ टीएमसी पाणी गुजरातला देण्याबाबत मा.मुख्यमंत्र्यांनी दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केंद्र शासनास पाठविलेल्या पत्रात सहमती दर्शविली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तज्ञ समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०४-२०१७) :** (१) होय.
(२) होय. समितीने संपूर्ण पाणी वापराचा बृहत आराखडा तयार केलेला आहे. सदर अभ्यास ढोबळ तांत्रिक पडताळणी व व्यवहार्यता तपासणीवर आधारीत आहे.
(३) प्रस्तावीत नार-पार, तापी नदीजोड योजनेतून नार-पार, अंबिका उपखोऱ्यातील ३०० दलघमी पाण्याचा गिरणा खोऱ्यात वापर करणे, सदर योजना राष्ट्रीय प्रकल्प म्हणून राबविणे, तसेच राज्याच्या हिस्याचे उर्वरित पाण्याची भरपाई तापी खोऱ्यात अन्यत्र करणे या शर्तीसह महाराष्ट्र पार-तापी-नर्मदा वळण योजनेस समंती देण्याचा विचार करू शकेल अशा तडजोडीची शक्यता मा.मुख्यमंत्री यांनी दि.१६ जानेवारी, २०१५ रोजी केंद्रीय जलसंसाधन मंत्री महोदयांच्या पत्रात व्यक्त केली होती.
(४) सदर अहवाल ढोबळ तांत्रिक पडताळणी व व्यवहार्यता अभ्यासावार आधारित आहे. या अहवालातील पाणी वापराचा बृहत आराखडयाचा सविस्तर तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करून त्यानंतरच शासन या बाबतचे धोरण निश्चित करणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे निमोण ते सोनेवाडी इजिमा-२६७ व पिंपळे सोनेवाडी फाटा मालदाड ते संगमनेर या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(११) ६५०६४ (०५-०१-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे निमोण ते सोनेवाडी इजिमा-२६७ व पिंपळे सोनेवाडी फाटा मालदाड ते संगमनेर हा रस्ता दगडखाणी व क्रेशरच्या अवजड वाहतुकीने खराब झाल्यामुळे सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता गौण खनिज निधीतून निधी मिळण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हापरिषद, अहमदनगर यांच्याकडून जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास विलंब झाल्यामुळे सदर रस्त्याच्या दुरुस्तीस निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती तातडीने करण्याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांना पत्राद्वारे कळविण्यात येऊनही याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०५-२०१७) :** (१) हे खरे नाही. अंदाजपत्रक दि.१६.८.२०१६ अन्वये जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे जिल्हा परिषदेने पाठविले आहे.
(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्नांकित रस्त्यामध्ये दोन रस्त्यांचा समावेश आहे.

अ) निमोण सोनेवाडी ते इजिमा-२६७ ग्रामीण मार्ग क्र.४ या रस्त्याची लांबी ४.५० कि.मी.आहे. त्यापैकी ०/०० ते ३/५०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभाग असून सुस्थितीत आहे. उर्वरीत लांबीपैकी ३/५०० ते ४/१०० कि.मी. लांबीचे रस्त्याचे रु.११.०० लक्षचे काम सन २०१६-१७ मध्ये रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आले असून निधीही वितरीत करण्यात आला आहे.

ब) पिंपळे, सोनेवाडी फाटा, मालदाड ते संगमनेर रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.२६७ असून या रस्त्याची एकूण लांबी ११.५०० कि.मी. आहे. त्यापैकी ६/०० ते ६/६०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे रु.११.०० लक्षचे काम सन २०१६-१७ मध्ये रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आले असून निधीही वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत लांबीपैकी ७/५०० ते ११/५०० कि.मी. पृष्ठभाग डांबरी असून सुस्थितीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्याच्या ६७० कोटींच्या पर्यटन विकास आराखडयास मंजुरी मिळण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

**(१२) ६५१९९ (०९-०१-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्याच्या ६७० कोटींचा पर्यटन विकास आराखडा शासनाला सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडयास मंजुरी देवून पहिल्या टप्प्यात ८० कोटी रूपये उपलब्ध करून दयावेत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी करूनही विलंब लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आराखड्यास मंजुरी देवून निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०६-०६-२०१७) :** (१), (२), (३) व (४) रत्नागिरी जिल्हा पर्यटन बृहत आराखड्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच रत्नागिरी जिल्हा बृहत आराखड्याबाबत मा.मंत्री (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३/७/२०१६ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत ऐतिहासिक, नैसर्गिकदृष्ट्या संपन्न, वारसास्थळे, महत्वाची तीर्थस्थळे यामधून (१) मार्लेश्वर, (२) मांडवी, (३) भाटे, (४) थिबा पॅलेस, (५) सावतसडा, (६) बाणकोट किल्ला, (७) रत्नदुर्ग किल्ला ही पर्यटन स्थळे निवडण्यात आली असून त्यांचा प्राथम्याने विकास करण्याचे ठरले. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या रू.८० कोटीच्या प्रस्तावाबाबत वरीलप्रमाणे प्रस्ताव करण्याच्या तसेच कामांसाठी निधीच्या मागणीचा प्रस्ताव सादर करतांना

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांच्या साक्षांकनाने अंदाजपत्रक व नकाशे सादर करण्याबाबत व विहित नमुन्यातील माहिती तसेच सचिव समितीच्या मान्यतेसाठी माहिती व आवश्यक कागदपत्रे सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रत्नागिरी व व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना देण्यात आल्या आहेत. तसेच २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील रू.२८४.४६ लक्षच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

---

**भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीवर बांधण्यात येत असलेल्या गोसीखुर्द या प्रकल्पाच्या वाढती किंमतीनुसार निधी मिळण्याबाबत**

**(१३) ६५३०८ (०२-०१-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील भंडारा जिल्ह्यातील, वैनगंगा नदीवर बांधण्यात येत असलेल्या, गोसीखुर्द या प्रकल्पाच्या, १८,४९४ कोटी रुपयाच्या प्रस्तावास शासनाने, दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू राष्ट्रीय सिंचन प्रकल्पाची मुळ ३७२ कोटी असलेली किंमत आज १८,४९४ कोटी रुपयावर गेली असल्याने सदरहू प्रकल्पाची किंमत एवढया मोठया प्रमाणात वाढण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाची वाढती किंमत विचारात घेता केंद्र व राज्य शासनाकडून वेळेत निधी प्राप्त करुन प्रकल्पाचे विकास कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०४-२०१७) :** (१) होय.

मा. मंत्रीमंडळाच्या दि. ३०/८/२०१६ रोजी झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने दिनांक २१/०९/२०१६ रोजी सुधारीत प्रशासकीय मान्यता शासन निर्णय निर्गमित केला आहे.

(२) प्रकल्प कार्यान्वयीकरणाचा कालावधी लांबल्याने झालेली दरवाढ, भूसंपादन किंमतीत झालेली वाढ, पुनर्वसन पॅकेज, संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ, व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेनंतर अंतर्भूत वाढीव घटक, आस्थापना खर्चातील वाढ हे प्रकल्पाच्या किंमतवाढीचे प्रमुख घटक आहेत.

(३) केन्द्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजने अंतर्गत केंद्रीय अर्थसहाय्य तसेच नाबार्ड कडुन कर्ज प्राप्त करुन प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पायाभूत सुविधांचे प्रकल्प उभारण्याबाबत

**(१४) ६५३५९ (१६-०१-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विकासासाठी आवश्यक पायाभुत सुविधांच्या प्रकल्प उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याकरिता व ते मार्गी लावण्याकरिता राज्य शासनाच्या मुंबईतील आरे, चित्रनगरी तसेच अन्य भागांतील पडीक जमिन विकुन किंवा त्यांचे विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) विकुन हा निधी उभारण्यात येणार असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यानुसार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी वित्त विभागाचे अप्पर मुख्य, सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली असून समितीस तीन महिन्यांत शासनास अहवाल सादर करण्यास सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, त्यात कोणकोणत्या उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, अद्यापपर्यंत अहवाल प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०४-२०१७) :** (१) नाही.

(२) होय, राज्यात पायाभूत सुविधांचा विकास जलद गतीने होण्यासाठी विविध प्रशासकीय विभागांच्या ताब्यात असलेल्या जमिनींचा वापर अधिक परिणामकारकपणे (Monetisation / Securitisation of Land) करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी दि.३.९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये समितीची स्थापन करण्यात आली आहे.

(३) समितीचा अहवाल अद्यापि अप्राप्त असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(४) यासंदर्भात समितीच्या बैठका अद्याप होत आहेत.

---

## महिंद (ता.पाटण) येथील प्रकल्पातंर्गत बाधित मौजे चौगुलेवाडी येथील नागरी सुविधांच्या कामांना निधी देण्याबाबत

**(१५) ६५४१२ (०२-०१-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिंद (ता.पाटण, जि.सातारा) येथे कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत लघू पाटबंधारे तलाव प्रकल्प साकारण्यात आला असून या प्रकल्पामुळे अंशत: बाधित झालेल्या बोर्गेवाडी गांवाचे मौजे चौगुलेवाडी येथे पुनर्वसन करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गांवाचे पुनर्वसन करताना बोर्गेवाडी प्रकल्पग्रस्तांना गावठाण देताना सन २००१-०२ मध्ये नागरी सुविधांची कामे पुर्ण करण्यात आली होती परंतू या ठिकाणी पाण्याची सोय नसल्याने प्रकल्पग्रस्त इथे स्थलांतरीत झाले नसल्यामुळे येथे देण्यात आलेल्या नागरी सुविधांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुरवस्था झालेल्या नागरी सुविधांची कामे करुन प्रकल्पग्रस्तांना स्थलांतरीत करण्यात मदत व्हावी याकरीता दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सातारा पाटबंधारे विभागाकडे पत्रव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लघू पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी या नागरी सुविधांच्या कामाकरीता शासनाकडून सुमारे २३ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध व्हावा याकरीता शासनाकडे कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे मार्फत प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०६-२०१७) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. निधी अभावी प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या मुल्यांकनाचे पैसे वाटप न झाल्यामुळे प्रकल्पग्रस्त गावठाणामध्ये स्थलांतरीत झाले नाहीत. त्यामुळे पुरविण्यात आलेल्या नागरी सुविधा नादुरूस्त झालेल्या आहेत.

(३) होय.

(४) होय.

(५) नागरी सुविधांच्या दुरूस्तीचे प्रस्तावास महामंडळाचे पत्र दि. ६/१२/२०१६ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यापुढील कार्यवाही  क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील गडबोरी वितरिकेच्या लाभार्थ्यांना घोडाझरी प्रकल्पाचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१६) ६५५१४ (०२-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील घोडाझरी प्रकल्पात भरपूर जलसाठा असतांना गडबोरी वितरिकेला अत्यंत अल्पप्रमाणात पाणी सोडल्यामूळे गडबोरी वितरिकेचे लाभार्थ्यांच्या धान पिक पाण्या अभावी धोक्यात आल्यामूळे घोडाझरी प्रकल्पाच्या पाण्यासाठी ८१ शेतकऱ्यांनी सामुहिक आत्महत्या करण्याचा इशारा मा.पालकमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री, जिल्हाधिकारी चंद्रपूर, कार्यकारी अभियंता सिंचाई विभाग चंद्रपूर यांना दिलेल्या निवेदनातून केली असल्याची माहिती दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार लाभार्थ्यांना घोडाझरी प्रकल्पाचे पाणी उपलब्ध होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०४-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रकल्पाच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांनी सामुहीक आत्महत्या करण्याबाबतची बातमी दैनिक सकाळ दि.२०/९/२०१६ मध्ये प्रकाशीत झाली होती.

सदरबातमीच्या अनुषंगाने मा.मंत्री, वित्त, नियोजन व वने यांचे पत्र क्र.५०२६, दि.२०/०९/२०१६ अन्वये व मा.गृह राज्यमंत्री, भारत सरकार यांचे पत्र क्र.७०६२, दि.०५/०९/२०१६ अन्वये शेतकऱ्यांचे निवेदनाबाबत योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाले होते.

(२) याबाबत चौकशी करण्यात आली आहे.

संकल्पीत क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रास सिंचनासाठी पाणी देण्यात येत असल्यामुळे पाणी देण्यास विलंब झाला असल्याचे आढळले आहे.

(३) आवश्यक कार्यवाही करून सिंचन सुरळीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील धरणांच्या पाण्यावर आधारित मंजूर २२ खाजगी विद्युत प्रकल्प रद्द करण्यात आल्याबाबत

**(१७) ६५६८३ (०२-०१-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धरणांच्या पाण्यावर आधारित मंजूर २२ खाजगी विद्युत प्रकल्प सरकारकडून रद्द करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे प्रकल्प रद्द करण्याची कारणे काय आहेत तसेच सदरचे प्रकल्प चालू झाले असते तर किती मेगावॉट वीज राज्याला मिळणार होती,

(३) असल्यास, रद्द झालेल्या ठिकाणी नवीन जलविद्युत प्रकल्प उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) लहान जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणातून राबविण्याबाबत शासन धोरण शासन निर्णय क्र.PVT१२०४/(१६०/२००४)/जवि, दि. १५.०९.२००५ अन्वये जाहीर केलेले आहे. सदर खाजगीकरणाचे धोरणा नुसार व ज्या प्रकल्पांचे करारनामे झाले आहेत त्याकरिता करारनाम्यातील तरतूदी नुसार निश्चित करण्यात आलेले प्रगती दर्शक टप्पे विहित कालावधीत पूर्ण होऊ शकले नाहीत असे जलविद्युत प्रकल्प खाजगीकरण धोरण व जलविद्युत प्रकल्प विकास करारनाम्या (HPDA) तील तरतूदी नुसार रद्द करण्यात आले आहेत. सदर २२ प्रकल्पातील बहुतांश प्रकल्प अन्वेषण स्तरावर रद्द केल्याने या प्रकल्पामुळे निर्माण होऊ शकणारी एकूण स्थापित क्षमता नमूद करता येत नाही.

(३) सदर जलविद्युत प्रकल्पांबाबत प्रकल्प स्थळांची जलनिष्पती, तसेच पाण्याची उपलब्धता विचारात घेवून तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यतेचा प्राथमिक अभ्यास करुन फेर निविदा काढण्यासंबधी संबंधितांस निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ६ जलविद्युत प्रकल्पाच्या दुरूस्तीची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ६५८१६ (०६-०१-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकारच्या मालकीचे असलेले राज्यातील ४६५ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेच्या कोयना तिसरा टप्पा, वीर, भाटगर, कोयना डॅम फुट, वैतरणा व येलदरी या ६ जलविद्युत प्रकल्पाची कालमर्यादा संपली असतानाही त्याची अद्याप दुरूस्ती झालेली नसल्यामुळे सदरहू प्रकल्पाची वीजनिर्मिती कोणत्याही क्षणी बंद पडण्याची स्थिती निर्माण झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३ हजार ६०० मेगावॅट वीजनिर्मीती क्षमतेचे २६ जलविद्युत प्रकल्प असून उपरोक्त ६ प्रकल्पाला ४० पेक्षा जास्त कालावधी झाला आहे तसेच जलविद्युत प्रकल्पाला ३५ वर्षे झाल्यानंतर तेथील वीजनिर्मिती बंद करून त्याची विनाविलंब दुरूस्ती करणे आवश्यक असतानाही अदयापपर्यंत उपरोक्त ६ प्रकल्पाच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, सदरहू ६ जलविद्युत निर्मिती प्रकल्पाच्या दुरूस्तीचे काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०४-२०१७) :** (१) हे अंशतः खरे आहे.

कोयना तिसरा टप्पा जलविद्युत प्रकल्पास ४१ वर्षे ,वीर जलविद्युत प्रकल्पास ४१ वर्षे,भाटघर जलविद्युत प्रकल्पास ३९ वर्षे,कोयना धरण पायथा जलविद्युत प्रकल्पास ३६ वर्षे, वैतरणा जलविद्युत प्रकल्पास ४० वर्षे व येलदरी जलविद्युत प्रकल्पास ४८ वर्षे पूर्ण झाली आहेत. तथापी या प्रकल्पावरील विद्युत निर्मिती कोणत्याही क्षणी बंद पडेल अशी स्थिती निर्माण झालेली नाही. आवश्यकते नुसार या प्रकल्पातून वीज निर्मिती चालू आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.
(३) याबाबत उपरोक्त सहा प्रकल्पाची पाहणी करण्यात आली असून नुतनीकरण व आधुनिकीकरण करण्याची गरज असल्याचे आढळून आले.

(४) शासनास वरीलपैकी वीर, भाटघर व कोयना स्तर-३ या प्रकल्पांचे नुतनीकरण व आधुनिकीकरण कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झालेले आहेत. तसेच येलदरी,कोयना धरण पायथा व वैतरणा या जलविद्युत प्रकल्पांचे नुतनीकरण व आधुनिकीकरण कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. या प्रकल्पांच्या नुतनीकरणाच्या अंदाजपत्रकास शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान झाल्यानंतर निधीच्या उपलब्धते नुसार कामे हाती घेण्यात येतील.

सध्या या प्रकल्पावरील विद्युत निर्मिती ऊर्जा विभागाकडून होते. त्यांच्या नुतनिकरणाचे काम हे विद्युत निर्मिती चालू ठेवून करावी लागणार असल्याने ते ऊर्जा विभागाच्या निधीतून करावे असा निर्णय मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षते खाली दिनांक २.२.२०१६ रोजीच्या बैठकीत झालेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उजनी धरणातून आष्टी तालुक्यातील एल आय योजनेसाठी पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(१९) ६६०८६ (०२-०१-२०१७). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरणातून आष्टी तालुक्यातील एल आय योजनेसाठी पाणी पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अमंलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०४-२०१७) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दि.२७.८.२००९ अन्वये कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प (२३.६६ अ.घ.फु.) जिल्हा उस्मानाबाद व जि.बीड करीता रु.४८४५.०५ कोटी रक्कमेस प्रथम सु.प्र.मा.प्रदान केली असून यामध्ये उपसा सिंचन योजना क्र.३ आष्टी या योजनेव्दारे आष्टी तालुक्यातील एकूण २७५४३ हेक्टर क्षेत्रास उजनी धरणातून ५.६८ अ.घ.फु.पाणी देण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेचे काम एकूण ५ टप्प्यात करण्याचे नियोजन आहे. यामध्ये उजनी जलाशयावरील पेडगाव येथून पाणी उचलून सिना धरणात सोडणे, सिना धरणातील पाणी उचलून खुंटेफळ साठवण तलावात साठवणे व तेथून उपसाव्दारे पिंपळा, लोणी तलाव, कांबळी प्रकल्पात सोडणे. कांबळी प्रकल्पातून उपसाव्दारे किणी प्रकल्प व तेथून पुढे मातकूळी प्रकल्पात पाणी सोडणे या कामांचा समावेश आहे.

(३) शासन निर्णय दि.२७.८.२००९ अन्वये शासनाने या योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. प्रथम टप्प्यात १.६८ अ.घ.फु. पाणी वापराचे मर्यादेत कामे हाती घेण्यात येत आहेत. केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल विभाग, दिल्ली यांनी दिनांक १०.१२.२०१५

रोजी प्रस्तुत योजनेच्या TOR प्रस्तावास मान्यता दिली असून, पर्यावरण मान्यतेसाठी पुढील आवश्यक अभ्यास (Environmental Impact Assessment (EIA) व (Environmental Management Plan) (EMP) प्रगतीपथावर आहे. पर्यावरण मान्यता प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार सदर योजनेचे काम करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खाऱ्या पाण्याचे लोणार (जि. बुलढाणा) सरोवरातील पाण्याची पातळी घटली असल्याबाबत**

**(२०) ६६६०३ (०९-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खाऱ्या पाण्याचे लोणार (जि. बुलढाणा) सरोवरातील पाण्याची पातळी घटली असून काठावर क्षारयुक्त पदार्थाचे थर माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाण्याच्या पातळीत घट होण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच या ठिकाणी पर्यटकांकरिता कोणत्याच सुविधा नसल्याने पर्यटकही येत नसल्याने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१८-०४-२०१७) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) पर्यटकांच्या सोयी-सुविधांसाठी सन २००० मध्ये लोणार येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने पर्यटक निवास उभारले असून त्यामध्ये ८ सूटस्, २ लोक निवास, १ उपाहारगृह, १ सभागृह इत्यादी सुविधांचा समावेश आहे.

सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात लोणार पर्यटक निवासाची श्रेणीवाढ/नुतनीकरण करण्याकरिता रु.१४५ लक्ष निधी मंजूर करण्यात आला असून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत सदर काम दि.१६/९/२०१४ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

लोणार येथे पर्यटकांसाठी आंतराष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी लोणार पर्यटन स्थळाचा रु.९३.४६ कोटी इतक्या रकमेचा आराखडा मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या दि.१५/३/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत मंजूर करण्यात आला आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयामध्ये पर्यटनाचा विकास करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२१) ६६६७९ (०९-०१-२१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या कोल्हापूर जिल्हयामध्ये पर्यटन क्षेत्राबाबत जाणीव, समांतर वाहतूक यंत्रणा, तसेच माहिती देण्याच्या व्यवस्थेचा अभाव यामुळे कोल्हापूरच्या पर्यटनाचा विकास होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटनाच्या विकासातून शहराच्या विकासाला चालना देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०६-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवतनाही. तथापि, कोल्हापूर जिल्हयामध्ये २२ वर्दळीच्या ठिकाणी फलक, कोल्हापूर नगरपालिका हद्दीत ३३१ माहितीफलक तसेच शहरांतर्गत विविध ठिकाणी वाहतुकीच्या विनियमनाचे फलक बसविण्यात आले आहेत. जिल्हयातील पर्यटन/धार्मिक/ऐतिहासिक स्थळांसाठी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना-विशेष निधी, प्रादेशिक पर्यटन विकास योजना, सामाजिक न्याय विभाग इत्यादीमार्फत निधी उपलब्ध झाला आहे. जिल्हा नियोजन समितीअंतर्गत पर्यटनासाठी सन २०१६-२०१७ मध्ये रू.४ कोटी व इको-टुरिझमसाठी रू.२.५० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. पन्हाळा येथे लाईट अँड साऊंड शो उभारण्याकरिता व वन विभागामार्फत इको-टुरिझमअंतर्गत साहसी पर्यटनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्हयातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले जात असून त्यामुळे रोजगार निर्मिती व उत्पन्न वाढीस हातभार लावणे शक्य होणार आहे.

---

## चंद्रपूर जिल्हयातील भिसी ग्रामपंचायततंर्गत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांने घरकुल योजनेची रक्कम सलग दोनदा घेऊन गैरव्यवहार केल्याबाबत

**(२२) ६६७११ (०५-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील भिसी ग्रामपंचायतील कर्मचाऱ्यांने सलग दोनवेळा आपल्या आईच्या नावे घरकुल मंजूर करुन घेत या योजनेची रक्कम घेवून गैरव्यवहार केल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्‌नुसार गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामपंचायतील कर्मचाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०४-२०१७) :** (१) होय.
(२) होय.

श्रीमती. रजिया अल्लाउद्दीन शेख यांना सन २००८-०९ व सन २०१५-१६ या वर्षात घरकुलाचा लाभ दोनवेळा दिल्याची बाब निदर्शनास आली आहे.

श्री जावेद अल्लाउद्दीन शेख, ग्रामपंचायत कर्मचारी व त्याची आई श्रीमती. रजिया अल्लाउद्दीन शेख यांचे एकच कुटुंब आहे. कुटुंबाला दोन वेळेस लाभ घेता येत नाही असे माहीत असूनही त्यांनी ही बाब ग्रामसेवक किंवा सरपंच यांच्या निदर्शनास आणून दिलेली नाही.

श्रीमती. रजिया अल्लाउद्दीन शेख यांना सन २००८-०९ या वर्षात घरकुलाचा लाभ मिळाल्याची शहानिशा न करता सरपंच श्री. अरविंद सिताराम रेवतकर व संबंधित ग्रामसेवक श्री.आर.एम.बोपनवार यांनी सन २०१५-१६ या वर्षात घरकुल मंजुरीचा प्रस्ताव पंचायत समितीस पाठवल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) घरकुल लाभार्थी श्रीमती. रजिया अल्लाउद्दीन शेख यांना नोटीस देऊन दुसऱ्या वेळेस देण्यात आलेले घरकुलाचे अनुदान रु. १ लक्ष भरणा करण्यास व भरणा न केल्यास त्यांचेविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

तसेच, संबंधित सरपंच श्री. अरविंद सिताराम रेवतकर यांचे विरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे ३९(१) नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे तसेच संबंधित ग्रामसेवक श्री.आर.एम.बोपनवार यांचेविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

लाभार्थीचा मुलगा श्री. जावेद अल्लऊद्दीन शेख ग्रामपंचायत कर्मचारी यांचा खुलासा घेऊन त्यांचेविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### फोकुर्डी-मार्कडा (ता.चामोर्शी, जि.चंद्रपूर) या मुख्य मार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२३) ६६७२३ (१६-१२-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फोकुर्डी-मार्कडा (ता.चामोर्शी, जि.चंद्रपूर) या मुख्य मार्गाची दुरवस्था झाल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुख्यमार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडल्यामुळे वाहनधारक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त मार्गाची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०५-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) फोकुर्डी-मार्कडा हा रस्ता मार्कंडादेवी फोकुर्डी चाकलपेठ कान्होली वेलतुर वाघोली दोटकुली या इतर जिल्हा मार्ग क्र.५९ चा भाग रस्ता असून त्याची लांबी ४.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते ०/५०० कि.मी. लांबीतील काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमधून पूर्ण करण्यात आले आहे. ०/५०० ते १/५०० कि.मी. लांबीमधील डांबरीनुतनाकरणाचे काम सन २०१४-१५ मध्ये तसेच १/५०० ते ३/०० कि.मी. लांबीतील डांबरीनुतनीकरणाचे काम २०१५-१६ मध्ये पूर्ण करण्यात आले असून रस्ता सुस्थितीत आहे. ३/०० ते ४/०० कि.मी. लांबीच्या डांबरीनुतनीकरणाचे कामही पूर्ण करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ब्रम्हपुरी (जि. चंद्रपूर) तालुक्यातील शेतक-यांना गोसीखुर्द कालव्याचे पाणी देण्याबाबत**

**(२४) ६६७५२ (०२-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोसीखुर्द कालव्याचे पाणी शेतकऱ्यांना मिळत नसल्याने ब्रम्हपुरी तालुक्यातील (जि. चंद्रपूर) हजारो शेतकऱ्यांनी नागपूर-गडचिरोली राज्य मार्गावर किन्ही गावाजवळ दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास रास्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर कालव्याचे पाणी शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०४-२०१७) :** (१) होय.
(२) गोसीखुर्द कालव्याचे पाणी ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांना देण्यात आलेले आहे. गोसीखुर्द उजवा कालव्याच्या सा.क्र.४९७८० वरुन निर्गमित होणाऱ्या B-३ शाखा कालव्याच्या सा.क्र. ६५६० चे पुढे श्री. भर्रे या एका कास्तकाराने अडथळा निर्माण केल्यामुळे त्याखाली येणाऱ्या खरकडा, किन्ही, निमगाव, पाचगांव रणमोचण गांगलवाडी येथील लाभ धारकांना पाणी उपलब्ध करुन देण्यात अडचण निर्माण झाली होती.
(३) तहसिलदार, ब्रम्हपुरी, पोलीस ठाणेदार व जलसंपदा विभागाचे अधिकारी यांचे समक्ष दिनांक २८/८/२०१६ ला कालवा सलग करुन शेतकऱ्यांना पाणी देण्यात आले व त्यामुळे या भागातील ५ गावातील २५१ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आणण्यात आले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजगड (ता.वेल्हे) या किल्ल्याच्या परिसरात पर्यटकांसाठी सुविधा निर्माण करण्यासाठी जमीन मिळण्याबाबत**

**(२५) ६६९३३ (१६-१२-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील किल्ले मालिका विकास प्रकल्पांतर्गत राजगड (ता.वेल्हे) या किल्ल्याच्या परिसरात पर्यटकांसाठी सुविधा निर्माण करण्यासाठी जमीन मिळणेबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पुणे यांनी दिनांक १६ जानेवारी, २०१५ व लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ सप्टेंबर, २०१६ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०६-२०१७) :** (१), (२) व (३) राजगड किल्ल्याच्या परिसरात पर्यटकांसाठी सोयी-सुविधा निर्माण करण्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत मा.लोक प्रतिनिधींनी दि.१६/९/२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना विनंती केली आहे. त्या अनुषंगाने महामंडळाने जिल्हाधिकारी,पुणे यांना जागा उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली असून अद्याप जागा उपलब्ध झालेली नाही. महामंडळाकडून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**सुर्या (जि.पालघर) धरणाच्या प्रकल्पाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवास इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२६) ६७००३ (०२-०१-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू, पालघर, विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील शेतीला पाणी पुरवठा करण्याच्या उद्देशाने ४० वर्षापूर्वी सूर्या नदीवर धामणी येथे सुर्या धरण बांधण्यात येऊन सदर प्रकल्पाचे कार्यालय व कर्मचा-यांच्या सोयीसुविधा आणि निवासासाठी सुमारे ५० ते ६० एकर क्षेत्रामध्ये सूर्या नगर येथे लाखो रुपये खर्चून वसाहत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १० वर्षापूर्वी सूर्या प्रकल्पाची सर्व कार्यालये बंद करुन सदर प्रकल्प भातसा कालवा क.१ (ता.शहापूर, जि.ठाणे) जोडण्यात येऊन तेथील सर्व कर्मचा-यांच्या बदल्या केल्या मात्र १० ते १५ कर्मचारी तेथे अजून रहात असून गेल्या १५ वर्षापासून इमारतीची दुरुस्ती व देखभाल न झाल्यामुळे इमारतीची पडझड झाली असून बांधकाम व पत्रे तुटले असून इमारतीवर झाडेझुडपे वाढली असल्याने तेथे राहत असलेल्या कर्मचाऱ्यांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, त्यानुसार सदर निवास इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०४-२०१७) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सूर्या प्रकल्पांर्गत धरण व कालव्याच्या बांधकामाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यालय व कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी सुमारे ४४.५० हे. क्षेत्रावर सन १९७७ मध्ये तात्पुरत्या स्वरुपाच्या इमारतींचे सूर्यानगर वसाहतीत बांधकाम करण्यात आले होते.
(२) होय, अंशत: खरे आहे.

दि. ३१/५/२००८ रोजी तत्कालीन सूर्या कालवा विभाग क्र. १, सूर्यानगर बंद करण्यात येवून सदर विभागाचा कार्यभार भातसा कालवा विभाग क्र. १ शहापूर या कार्यालयास जोडण्यात आला. सद्यस्थितीत, सदर वसाहतीत प्रकल्पाशी संबंधीत २२ कर्मचारी निवास करतात.

अतिपर्जन्याच्या प्रदेशातील तात्पुरत्या स्वरुपाच्या ४० वर्षे जुन्या इमारतींची मोठया प्रमाणावर झीज झाली आहे. निवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवासाची तात्पुरती दुरुस्ती करुन देण्यात आली आहे.
(३) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई यांनी दि. ०६/१०/२०१५ रोजी केलेल्या पाहणी दौऱ्याच्या अनुषंगाने सदर वसाहतींमधील राहण्यास अयोग्य इमारतींचा आढावा घेवून निर्लेखन करण्यात आले आहे.
(४) नवनिर्मित पालघर पाटबंधारे विभाग, मनोर अंतर्गत सिंचन शाखा सूर्यानगर वसाहतीत कार्यरत करण्याच्या अनुषंगाने कार्यालयीन इमारती व कर्मचा-यासाठी आवश्यक निवासस्थाने दुरुस्त करणेसाठी प्राकलने तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हा परिषदेकडून मंजूर करण्यात आलेल्या इंदिरा आवास घरकूल योजनेतंर्गत लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत

**(२७) ६७४६९ (१६-१२-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेकडून मंजूर करण्यात आलेल्या इंदिरा आवास घरकूल योजनेत घरकूल मंजूरीच्या याद्या वेळेवर प्रसिध्द करण्यात येवून पंचायत समितीकडून या लाभार्थ्यांना दिले जाणारे अनुदान तीन टप्प्यांत व तेही वेळेवर मिळत नसल्याचा प्रकार दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०४-२०१७) :** (१) होय.
(२) घरकुल लाभार्थ्यांना वेळेवर अनुदान प्राप्त होण्यासाठी आवश्यक सूचना गट विकास अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.
(३) विलंबाची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. लाभार्थ्यांचे बँक खाते क्रमांक वेळेवर न मिळणे.

२. FTO जनरेट केल्यानंतर PFMS प्रणालीमध्ये लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रत्यक्ष अनुदान वर्ग होणेस विलंब लागणे.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घरकुलांच्या लाभार्थ्यांकडुन हजेरी पटाची मागणी वेळेत न होणे.

---

## पुणे जिल्ह्यातील निरा-देवघर, गुंजवणी चापेट व सातारा जिल्ह्यातील धोम-बलकवडी प्रकल्पांची अनेक अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत

**(२८) ६७५१२ (०६-०१-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील निरा-देवघर, गुंजवणी चापेट व सातारा जिल्ह्यातील धोम-बलकवडी प्रकल्पांची अनेक अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०४-२०१७) :** (१) होय.
(२) १. निरा देवघर प्रकल्प :- निरा देवघर उजवा कालव्याचे कि.मी.१ ते ३९ मधील कामे पुर्ण झालेली असुन, कि.मी.४० ते ६५ पर्यंतची कामे जून २०१७ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

२. गुंजवणी प्रकल्प :-गुंजवणीधरण व सांडव्याचे काम पुर्ण झालेले असुन, कालव्याची कामे बंद नलिकेव्दारे करणेकरीता सविस्तर संकल्पनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सन २०१६-१७ मध्ये रु. ३० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित केला आहे.

**को.प.बंधारे दुरूस्ती :-** गुंजवणी नदीवरील को. प. बंधारे दुरूस्तीची अंदाजपत्रके मान्यतेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

३. धोम बलकवडी प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत समाविष्ट असून या प्रकल्पासाठी सन २०१६-१७ मध्ये रु. ६० कोटी निधी अर्थसंकल्पित केला असून पूर्ण निधी वितरित केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झाडी (ता.मालेगाव, जि. नाशिक) गावाजवळील छोटापूल व रस्ता अतिवृष्टीने वाहून गेल्याबाबत**

**(२९) ६७५९१ (०५-०१-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत इ.व.द. विभाग क्र. २ या विभागाच्या अधीन असलेल्या मालेगाव तालुक्यातील इजिमा - ११४ गिरणारे झाडी सावकार्वाडी जळगाव मळगाव ते प्रजिमा -५४ या रस्त्यावरील किमी २/९०० मध्ये झाडी गावाजवळील छोटापूल व रस्ता सप्टेंबर २०१६ मध्ये अतिवृष्टीने वाहून गेलेला आहे तसेच या रस्त्यावरील मो-या व डांबरीकरणाच्या कामाचे नुकसान झाल्यामुळे झाडी गावापासून या रस्त्यावरील अवजड वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आलेले आहे,
(३) असल्यास,उपरोक्त रस्त्याचे संपूर्ण लांबीचे नुतनीकरण व त्यावरील पुलांचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०५-२०१७) :** (१) दि.२३.९.२०१६ च्या अतिवृष्टीमुळे पेव्हडिप हेडवॉल व पाईप वाहून जावून काही तास वाहतुक बंद झाली होती, हे खरे आहे.
(२) या बाबत जिल्हा परिषदेकडून पहाणी करण्यात आली असून सदर पेव्हडिप वाहुन गेलेले पाईप पुन्हा जोडुन व दगड मुरुम टाकुन दि.२४.९.२०१६ रोजी तात्पुरती दुरुस्ती केली असून वाहतुक सुरळीत करण्यात आली आहे.
(३) प्रश्नांकित रस्त्याची लांबी १४.०० कि.मी. असून या संपूर्ण लांबीत एकूण १४ नाला क्रॅासींग असून त्यापैकी १० नाल्यावर जलनिस:रणाची बांधकामे झालेली आहेत. त्यापैकी सा.क्र. २/९०० मधील नाल्यावरील वाहून गेलेले पाईप पुन्हा जोडुन व दगड मुरुम टाकून तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली आहे.

सन २०१६-१७ मध्ये रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत तालुका हद्द झाडी सावकारवाडी जळगाव (नि)रस्ता सा.क्र.१०/५०० मध्ये मोरी दुरुस्तीचे रु.३.०७ लक्षचे काम मंजूर करण्यात आले आहे.

सदर रस्त्याच्या १४.०० कि.मी. लांबीपैकी ३.५० कि.मी. लांबीमधील मजबुतीकरण व डांबरीकरण तसेच १०.५० कि.मी. लांबीतील डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरणाचे व सा.क्र.२/९००

मधील स्लॅब ड्रेन बांधण्याचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषानुसार प्राथम्यक्रमाने टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा (जि.लातूर) तालुक्यातील गाडेवाडी येथील शेतकऱ्याच्या नावे केलेला गैरव्यवहार**

**(३०) ६७६०० (१६-१२-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील गाडेवाडी येथील शेतकरी संगप्पा बोमणे यांना उस्मानाबादच्या इको बँकेने व सोलापूरच्या कॅनरा बँकेने कर्ज दिल्याचे दाखवून ती रक्कम परस्पर अन्य खात्याकडे वळविली असल्याचे दिनांक २० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच अनेक प्रकरणांत शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय पतसंस्था, बँका शेतकऱ्यांचे अनुदानाचा रकमा परस्पर इतर खात्याच्या कर्जात वळती करत असल्याने याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्याच्या सहमतीशिवाय झालेल्या या परस्पर व्यवहाराबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०६-२०१७) :** (१) लातूर जिल्हयातील औसा तालुक्यातील गाडेवाडी येथील शेतकरी श्री.नरसिंग संगप्पा बोमणे यांना कॅनरा बँक, सोलापूर शाखा तसेच युको बँक, उस्मानाबाद यांनी कर्ज मंजूर केलेले असून लोकमंगल माऊली शुगर इंडस्ट्रीज, लोहारा यांच्यासोबत झालेल्या कराराप्रमाणे ऊस उत्पादनाकरीता श्री.बोमणे यांना कर्ज देण्यात आले. सदरील साखर कारखान्याला ऊसाचा पुरवठा झाल्यानंतर साखर कारखान्याकडून आलेल्या ऊस उत्पादकांच्या पैशातून खाती बंद केली.

(२) अशी बाब सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे या कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३), (४) व (५) याबाबत पोलीस ठाणे, किल्लारी यांच्या दिनांक ७.१२.२०१६ च्या पत्रान्वये प्राप्त माहितीनुसार संबंधित लाभार्थीने याप्रकरणी दिलेल्या तक्रार अर्जावरुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. श्री.नरसिंग बोमणे यांनी दिनांक ८.१२.२०१६ रोजी पोलीस ठाण्यात येऊन सदरची तक्रार त्यांनी गैरसमजुतीने दिलेली आहे. या प्रकरणात त्यांची तक्रार नाही, असा लेखी जबाब दिलेला आहे.

---

**वरणगाव तळवेळ (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील सिंचन योजना पूर्ण करण्याबाबत**

**(३१) ६७६५३ (०२-०१-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरणगाव तळवेळ (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे सिंचन योजनेस दिनांक १२ ऑक्टोबर, १९९८ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता मिळूनही काम प्रलंबित असताना योजना पूर्ण करण्यासाठी येत असलेल्या अडचणी दूर करण्याबाबत शासनाची मंजुरी मिळावी यासाठी कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे महामंडळ, जळगाव यांनी जलसंपदा विभागास सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना तेथील लोकप्रतिनिधीने दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पास दिनांक ६ जुलै, १९९९ रोजी ३०२.२६ कोटी रुपयांची मंजुर प्रशासकीय मान्यता तर सुप्रमा रुपये ९१६.८१ कोटी दिनांक ७ मे,२०१५ रोजी वा त्यासुमारास देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०४-२०१७) :** (१) होय खरे आहे.

(२) प्रकल्पास रुपये २२३.२४ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता दिनांक २२ ऑक्टोबर, १९९८ रोजी दिली होती. यानंतर सन १९९९-२००० चे दरसुचीवर आधारित नव्याने प्रशासकीय मान्यता दिनांक ६ जुलै, १९९९ रोजी रुपये ३०२.२५ कोटीस देण्यात आली. सध्या रुपये ९१६.४१ कोटीचा प्रशासकीय मान्यतेचा सुधारित प्रस्ताव मान्यतापूर्व छाननीत व वित्त विभागाचे शेरे पूर्ततेत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी परिक्षेत्रातील रमेडशी, वाकळवाडी, भामटवाडी, भारसुक बॅरेजस् व खैरखेडा दुबलवेल लघू पाटबंधारे योजनांना पाणी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३२) ६८१८५ (०६-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात ताणी खोऱ्या अंतर्गत काटेपूर्णा व मोर्णा उपखोऱ्यातील बॅरेजेस् व लघू पाटबंधारे योजना पाणी उपलब्धते अभावी मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात आल्या नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी परिक्षेत्रातील रमेडशी, वाकळवाडी, भामटवाडी, भारसुक बॅरेजस् व खैरखेडा दुबलवेल लघू पाटबंधारे योजनांना पाणी उपलब्ध करून देण्याबाबत दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०४-२०१७) :** (१) नाही, रमेडशी, वाकळवाडी, भांमटवाडी, मासरुळ, खैरखेडा व दुबलवेल या प्रकल्पाकरीता २२.५९ दलघमी पाणी आरक्षित आहे.
(२) नाही,

तथापी मा. आमदार अमित सुभाषराव झनक यांनी दिनांक १५/१२/२०१५ च्या पत्रान्वये बॅरेजसचे अंदाजपत्रक / आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत निवेदन मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना सादर केले आहे.
(३) मा. राज्यपाल यांचे निर्देशानुसार जोपर्यंत राज्य शासन चालु प्रकल्पावरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होवू देता निश्चित कालमर्यादेत प्रकल्प पुर्ण होण्याच्या दृष्टीने अतिरीक्त निधी उपलब्ध करुन देत नाही, तोपर्यंत नविन प्रकल्पाची कामे हाती घेता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृष्णा खोरे मध्यम पाटबंधारे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३३) ६९५२८ (०२-०१-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृष्णा खोरे मध्यम पाटबंधारे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पाची १४ वर्षे सुरुवात होऊन अदयाप प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना सन २०१३ च्या भूसंपादन कायदयाप्रमाणे नुकसान भरपाई देणार असल्याचे मा.पुनर्वसन मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१७) :** (१) हे अंशतः खरे आहे. वैभववाडी तालुक्यातील अरूणा मध्यम पाटबंधारे (जि. सिंधुदुर्ग) प्रकल्पावर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयामार्फत प्रकल्पग्रस्तांना भुखंड वाटपाकरीता दि. ०२/०९/२०१३, २६/१२/२०१३ व दि. ०४/०६/२०१४ रोजी नोटिसांद्वारे कळविण्यात आले होते.

तथापी प्रकल्पग्रस्तांनी सदर नोटीसा स्विकारल्या नाहीत. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मौजे मांगवली तिठा व वेंगसर येथे नियोजित असून ह्या गावठाणांचे भूसंपादन व भूखंडाचे सिमांकन पूर्ण करून त्यातील नागरी सुविधांची ८०% कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(२) होय. विभागीय आयुक्त कार्यालय कोकण विभाग, नवी मुंबई येथे अरूणा प्रकल्पाच्या पुनर्वसन व भूसंपादानाबाबत दि. १७/०९/२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांनी बुडीत क्षेत्रातील निवाडे भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना बाबत नवीन पुनर्वसन अधिनियम लागू करण्यातबाबत तपासून कार्यवाही करावी असे विभागीय आयुक्त, कोकण भवन यांना निर्देश दिले आहेत.
(३) निवाडे सुधारित करून आयुक्त कार्यालयाने शासनास मान्यतेसाठी सादर केले असून कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यातील धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत चोरखमारा व बोद्‌लकसा या दोन उर्द्‌वनलिकेच्या प्रस्तावाला मंजुरी देण्याबाबत**

**(३४) ६९६५८ (०२-०१-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धापेवाडा (जि.गोंदिया) उपसा सिंचन योजना प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत चोरखमारा व बोद्‌लकसा या दोन उर्द्‌वनलिकेचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत व प्रस्तावास निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०४-२०१७) :** (१) नाही.

तथापी, धापेवाडा जि. गोंदिया, उपसा सिंचन योजना टप्पा-२ अंतर्गत सर्रा उर्ध्वनलिका (चोरखमारा तलावात पाणी सोडण्यास) व बोदलकसा उर्ध्वनलिका (बोदलकसा तलावात पाणी सोडण्यास) बाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.
(२) दोन्ही उर्ध्वनलिकेबाबत प्रस्तावाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत असून त्याबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

१) दोन्ही उर्ध्वनलिकाच्या संरेखा प्रस्तावांना प्रदेश कार्यालयाने मंजूरी दिली आहे.

२) बोदलकसा व सर्रा नलिकेचे सा.क्र. ० ते ८५१० पर्यंतचे एकत्रित सविस्तर संकल्पन व आराखडा म.स. सं.नाशिक यांचे कडून प्राप्त झाले असुन अंदाजपत्रकाची प्रदेश कार्यालयात तपासणी सुरु आहे.

३) बोदलकसा नलिकेचे सा.क्र.८५१० ते १९८०० पर्यंतचे सविस्तर संकल्पन व आराखडा म.स.सं., नाशिक यांचेकडून प्राप्त झाले असून अंदाजपत्रकाची प्रदेश कार्यालयात तपासणी सुरु आहे.

४) सर्रा नलिकेचे सा.क्र.८५१० ते १९९३० चे संकल्पनाचे म.स. सं.नाशिक येथे प्रगतीत आहे.

दिनांक ३०/१/२०१७ रोजीचे निधी पुर्नवाटप आदेशानुसार धापेवाडा टप्पा २ या प्रकल्पासाठी रु.१२.५४ कोटीचा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) येथील चांदोली (वारणा) धरणाच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याबाबत**

**(३५) ७००९२ (०२-०१-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) येथील चांदोली (वारणा) धरणाच्या परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचे असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याबाबतचे माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चांदोली धरण व परिसर हा प्रचंड मोठा परिसर असुनदेखील या ठिकाणी अवघे सहा सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले होते तसेच या परिसरातील इतरही महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबत निर्णय घेणार आहे काय,
(३) असल्यास, नादुरुस्त असलेले सीसीटीव्ही कॅमेरे त्वरीत दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०४-२०१७) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

धरणाच्या परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने धरणाच्या मेन गेटवर १ स्थिर कॅमेरा, उजव्या व डाव्या तीरावर प्रत्येकी १ स्थिर कॅमेरा व धरणाच्या माथ्यावर मध्यभागी १ फिरता कॅमेरा व धरणाच्या उजव्या अधोबाजूस व डाव्या अधोबाजूस प्रत्येकी १ स्थिर कॅमेरा असे एकुण ६ कॅमेरे बसविण्याचे काम प्रगतीत आहे.

सदर काम १२ महिन्यात पूर्ण करावयाचे असून काम पूर्ण करावयाची मुदत दि.०९/०३/२०१७ पर्यंत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यातील धरणातील पाणी चोरीने उपसा करत असल्याबाबत**

**(३६) ७०९५४ (२७-०१-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यातील सर्व धरणे व पाझर तलाव कोरडे पडले असून पाटबंधारे सिंचन विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याने धरणातील पाण्याची चोरी होऊन उपसा करण्यात येत असल्यामुळे ७० गावात गंभीर पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पाणीचोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व पाणीटंचाई असलेल्या गावात पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सोयगाव तालुक्यात माहे सप्टेंबर, २०१६ दरम्यान एकूण ११ लघु प्रकल्पापैकी ३ प्रकल्पात १००%, इतर ३ प्रकल्पात सरासरी ६५% तसेच उर्वरित ५ लघु प्रकल्पात ३०% पेक्षा कमी पाणीसाठा उपलब्ध होता. दरम्यानच्या काळात पावसाळा असल्याने कोठेही पाणी टंचाई बाबत तक्रार प्राप्त नसून पाणीचोरीमुळे पाणीटंचाईचा प्रश्न उद्भवलेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उचंगी धरणात पाणी अडविण्याच्या निर्णयाबाबत**

**(३७) ७११६९ (०६-०१-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उचंगी धरणामुळे प्रकल्पग्रस्त होणाऱ्या ५३ धरणग्रस्तांना २ कोटी ११ लाख रक्कमेचे वाटप करून उचंगी धरणात पाणी अडविण्याचा निर्णय माहे ऑगस्ट २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०४-२०१७) :** (१) मा. मंत्री, जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली दि. २९/०७/२०१६ रोजी त्यांचे मंत्रालयीन दालन, मुंबई येथे संपन्न बैठकीमध्ये “आवश्यक भूसंपादन व पुनर्वसन करुन जून-२०१७ मध्ये घळभरणी करण्याचे नियोजन करण्यात यावे” असा निर्णय झालेला आहे.
(२) प्रकल्पग्रस्तांना स्वेच्छा पुनर्वसन अनुदान वाटप करणेसाठी, रु. २.११ कोटी इतकी रक्कम उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), कोल्हापूर यांना दि. ३१/३/२०१६ रोजी हस्तांतरीत केली आहे. पुढील कार्यवाही महसूल विभागामार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिमा, सिना नदीसह सोलापूर जिल्ह्यातील सर्व नद्यावरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दरवाज्यांची झालेली दुरवस्था**

**(३८) ७१२३५ (०२-०१-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिमा, सिना नदीसह सोलापूर जिल्ह्यातील सर्व नद्यावरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे दरवाजे खराब झालेले असल्याने बंधाऱ्यामध्ये पाणी अडले जात नाही त्यामुळे जिल्ह्यातील सर्वच नद्यावरील खराब झालेले दरवाजे बदलण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यावरील खराब झालेल्या दरवाज्यांची पाहणी शासनाने केलेली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदरच्या खराब झालेले दरवाजे बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०४-२०१७) :** (१) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे पाणी अडविले जाते. तथापि, दरवाजे जुने असल्यामुळे त्यातून काही प्रमाणात पाण्याची गळती होत असते. ही गळती थांबविण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावरुन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.

(२) संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली आहे.

(३) आवश्यकतेनुसार दरवाजे बदलण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कुसूर (ता.येवला, जि.नाशिक) येथील संपादित जमीनीच्या वाढीव नुकसान भरपाईच्या प्रलंबित रकमा अदा करण्याबाबत**

**(३९) ७१९२९ (०६-०१-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुसूर (ता.येवला, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमीनीच्या वाढीव नुकसान भरपाईच्या प्रलंबित रकमा त्यांना अदा करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नांदूरमध्यमेश्वर जलद कालव्यासाठी संपादीत झालेल्या मौजे मुखेड (ता.येवला, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनींच्या नुकसान भरपाईच्या रकमा अदा करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केलेली मागणी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०५-२०१७) :** (१) होय.

(२) हे खरे आहे.

(३) उर्ध्व गोदावरी प्रकल्पातंर्गत कुसूर येथील दरसवाडी पोहोच कालव्यासाठी भुसंपादन कलम १८ खालील वाढीव देय नुकसान भरपाई रक्कम रु.४२.१४ लक्ष जानेवारी २०१७ मध्ये महसूल विभागाकडे संबंधीतांना अदा करण्यासाठी वर्ग करण्यात आली आहे. मौजे मुखेड येथील ४३ एलएआर प्रकरणातील एकूण रक्कम रु.७.२४ कोटी इतकी रक्कम देय आहे. मा.दिवाणी न्यायालयाचा निर्णयाबाबत महामंडळाचे कायदे सल्लागार यांनी दिलेल्या सल्लानुसार मा.उच्च न्यायालय येथे अपिल दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लक्ष्मी तलाव (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील हायडोप्रोजेक्टमुळे जुन्या जलविद्युत प्रकल्पास पाणी कमी मिळत असल्याने वीज निर्मिती खंडीत झाल्याबाबत

**(४०) ७३०६९ (०२-०१-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लक्ष्मी तलाव (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील हायडोप्रोजेक्टमुळे जुन्या जलविद्युत प्रकल्पास पाणी कमी मिळत असल्याने वीज निर्मिती खंडीत झाल्याने ती पुर्ववत सुरू करणेसाठी मा.राज्यमंत्री जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली बैठक नागपूर येथे आयोजित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांनी माहे डिसेंबर, २०१६ जुना शाहू कालीन जलविद्युत प्रकल्प पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करून विज निर्मिती करणेबाबत ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांना आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

याबाबत मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली दि.०९.१२.२०१५ रोजी नागपूर येथे बैठक संपन्न झालेली आहे.

(२) व (३) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांनी दि.०९.१२.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत उर्जा विभागांस कोणतेही आदेश दिलेले नाहीत. तथापि, राधानगरी प्रकल्पातून तलांक ५७५.५९ मीटरच्या खाली शिल्लक राहणाऱ्या पाण्याचे व overflow spill मधून उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा विजनिर्मितीच्या दृष्टीने वापराबाबतचे नियोजन सादर करण्याबाबत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सद्यस्थितीत

सिंचन / बिगरसिंचनासाठी पाणी वापर करुन, जुन्या विद्युत गृहामधून वीज निर्मिती करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(४१) ७५४६७ (०२-०१-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातला सुमारे १८ लाख सरकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या संदर्भात दिनांक १८, १९ व २० जानेवारी, २०१७ या कालावधीत तीन दिवसांचा संप करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाने सूचविलेल्या वेतनश्रेणीचा लाभ द्यावा, ५ दिवसांचा आठवडा करणे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष करावे इत्यादी विविध मागण्यांसदर्भात मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास अधिकारी व कर्मचारी संघटने बरोबर बैठक घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शाळा, महाविद्यालय या सर्वांसाठी ५ दिवसांचा आठवडा करण्याच्या राज्य शासकीय कर्मचारी संघटना, राजपत्रित अधिकारी संघटना व शिक्षक भरती यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या कर्मचा-यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर ५ दिवसांचा आठवडा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१७) :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ व सरकारी-निमसरकारी कर्मचारी शिक्षक संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र यांनी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक १८ जानेवारी, २०१७ ते दिनांक २० जानेवारी, २०१७ हया ३ दिवसांच्या कालावधीमध्ये राज्यव्यापी संप करण्याची नोटीस शासनास दिली होती, मात्र मा.मुख्यमंत्री यांनी केलेल्या आवाहनानुसार सदर संप संघटनेने स्थगित केला.

(२) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे समवेत दिनांक ३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास संघटनेसोबत बैठक आयोजित करण्यात आलेली नाही.
(३) होय.
(४) राज्य शासनाने श्री.के.पी.बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य वेतन सुधारणा समिती - २०१७ ची स्थापना केली आहे. राज्य शासकीय कार्यालयांसाठी ५ दिवसांचा आठवडा लागू करण्याची संघटनेची मागणी शासनाच्या विचाराधीन आहे. शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० करणे याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय दि.२४.११.२०१६ नुसार श्री.बी.सी.खटुआ, सेवानिवृत्त भा.प्र.से.अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील श्रीमलंगगडावरील फ्युनिक्युलर प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४२) ७६७८४ (०२-०१-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील श्रीमलंगगडावरील फ्युनिक्युलर प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार श्री हाजीमलंग गडावरील फ्युनिक्युलर प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०६-२०१७) :** (१), (२), (३) व (४) मलंगवाडी ते फ्युनिक्युलर रेल्वेच्या अंबरनाथ येथील लोअर स्टेशनपर्यंतच्या पोहोच रस्त्याच्या रू.१०१०.२२ लक्ष एवढ्या किंमतीच्या कामांना यापूर्वीच प्रशासकीय मान्यता देऊन रू.४४२ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला होता. आता शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.टीडीसी-२०१६/१०/प्र.क्र.७४०/पर्यटन, दि.४/१/२०१७ अन्वये सदर कामासाठी आणखी रू.१०० लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

**मुकबधीर शासकीय कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता मंजूर करण्यासाठी शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत**

**(४३) ७८०३० (०२-०१-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुकबधीर शासकीय कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता मंजूर करण्यासाठी वित्त विभागाने दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात सुधारणा करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन व लोकप्रतिनिधींच्या मागणीप्रमाणे शासन निर्णयात सुधारणा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) दि.१०.०८.२०१५ च्या शासन निर्णयात आवश्यक ती सुधारणा करुन दि.१८.०४.२०१७ रोजी शासन पूरकपत्र क्रमांक:वाहभ-२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५ निर्गमित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वित्त विभागाकडून योजना आणि योजनेत्तर खर्चाच्या एकत्रिकरणाच्या प्रस्तावाबाबत**

**(४४) ७९१७२ (०२-०१-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वित्त विभागाकडून योजना आणि योजनेत्तर खर्चाच्या एकत्रिकरणाचा प्रस्ताव मांडण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे मंत्रिमंडळाला सादरीकरण केल्याने योजना आणि योजनेत्तर खर्च एकत्रित करताना या दोन्ही खर्चाला आवश्यक खर्च आणि कार्यक्रमावरील खर्च असे संबोधले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जमाती आणि जातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात येणारी तरतूद विशेष घटक योजना म्हणून कायम राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१७) :** (१) होय. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.८८/अर्थ-१, दि. २७ जानेवारी, २०१७ अन्वये आर्थिक वर्ष २०१७-१८ पासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) अर्थसंकल्पीय खर्चाचे “अनिवार्य खर्च” व “कार्यक्रमांवरील खर्च” तसेच “महसूली” व “इतर (भांडवली, ऋण) खर्च” याप्रमाणे वर्गीकरण केले जाणार आहे.

(३) अनुसूचित जाती उप योजना व आदिवासी उप योजनेसाठी सन २०१६-१७ साठी योजनांतर्गत व योजनेतर मधून प्राप्त झालेला निधी मूळ आश्वासित (Base commitment)

निधी म्हणून निश्चित करण्यात येईल व अनुसूचित जाती घटक कार्यक्रम व आदिवासी घटक कार्यक्रम यांच्यासाठी सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद यापेक्षा कमी असणार नाही. तसेच सध्याच्या योजनेतर मधून वैयक्तिक लाभार्थ्यांसाठीच्या योजना जर कार्यक्रमांवरील खर्चाकडे वर्ग झाल्या तर त्या योजनांचा ११.८% निधी अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांसाठी व ९.४% निधी आदिवासी घटक कार्यक्रमांसाठी देण्यात येईल.
(४) अनुसूचित जाती घटक कार्यक्रम व आदिवासी घटक कार्यक्रम यामधून राखून ठेवावयाच्या निधीचे वितरण, व्यवस्थापन व संनियंत्रण संदर्भातील कार्यवाही अनुक्रमे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागाने पूर्वी प्रमाणेच करावयाची आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केळकर समितीच्या अहवालातील शिफारशीची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(४५) ७९५०७ (०२-०१-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ-मराठवाडयासह मागासभागांचा अनुशेष दूर करण्याकरिता नियुक्त केलेल्या केळकर समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीबाबत निर्णय घेण्याकरिता, मा.वित्तमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदर अहवाल सादर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०५-२०१७) :** (१) व (२) समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीच्या अहवालातील शिफारशी स्वीकारण्यासंदर्भात मा. मंत्री (वित्त व नियोजन, वने) यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीचा अहवाल अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) जलसंपदा विभागामार्फत**
**प्रकल्प मजूरांना मजूरी देण्याबाबत**

**(४६) ८०००२ (०२-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) जलसंपदा विभाग या विभागामार्फत प्रकल्प दुरुस्तीची किती व कोठे कोणती कामे सुरु आहेत,

(२) असल्यास, सदर कामांना मजूर पुरवठा करण्याचे कंत्राट कोणत्या कंपनीला किंवा संस्थेला देण्यात आले आहे व या मजूरांना कंत्राटदाराने ठरवून दिलेले पैसे देण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, या मजूरांना योग्य ते वेतन न देणाऱ्या या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत व मजूरांना मजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०५-२०१७) :** (१) यांत्रिकी विभाग अकोला अंतर्गत शहापूर प्रकल्प, वान, काटेपूर्णा खिरकुंड प्रकल्प, मोहगव्हान प्रकल्प, शिवनखुर्द प्रकल्प, पळसोबढ़े प्रकल्प (ज.शि.अ.), तुलंगा प्रकल्प (ज.शि.अ.), कोलखेड प्रकल्प (ज.शि.अ.),मांगुळ प्रकल्प (ज.शि.अ.) या प्रकल्पांचे कालवा स्वच्छता/मातीकाम इ. प्रकल्पांची कामे खात्यांतर्गत सुरु आहेत. तसेच या विभागामार्फत काटेपूर्णा, पोपटखेड, दगडपारवा, म्हस, अडान, निमगव वायाळ, सपान या प्रकल्पांची द्वार दुरुस्ती व देखभालीची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) उपरोक्त नमूद कालवा स्वच्छतेची कामे खात्यांतर्गत केली जातात. सदर कामास लागणारे संयत्रचालक, वाहनचालक व मदतनीस यांची सेवा ५ विविध मजूर सहकारी संस्था यांच्या कडून घेण्यात येते. मजूर सहकारी संस्था यांनी पुरविलेल्या कामगारांचे वेतन संबंधीत कंत्राटदारास शासकीय प्रचलित नियमानुसार भुगतान करण्यात येते व कंत्राटदारास त्याने पुरविलेल्या कामगारांचे वेतनाचे भुगतान दरमहा विनाविलंब करण्यात येते. यांत्रिकी विभाग, अकोला या कार्यालयात कंत्राटदाराच्या कोणत्याही कामगाराचे वेतन व भत्त्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही. निविदेद्वारे कार्यवाही करून सदर कामांना मजूर पुरवठा करण्याचे कंत्राट खालील सुशिक्षीत बेरोजगार संस्था यांना देण्यात आले आहे. १. आधार बहूउद्देशिय सेवा सहकारी संस्था मर्या., नागपूर. २. आदर्श बेरोजगार बहुउद्देशिय सेवा सह. संस्था, नागपूर. ३. विद्यानंद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था, औरंगाबाद. ४. जनसेवा मा. मजूर कामगार सह. संस्था मर्या. उरळ. ५.विकास मा.मजूर कामगार सह. संस्था मर्या. गोरेगांव.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशिम येथील जलसंपदा मंडळातंर्गत शाखा अभियंताची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४७) ८१६४९ (०२-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम येथील जलसंपदा मंडळाअंतर्गत शाखा अभियंताची सुमारे ३५ पदे तसेच सिचंन व्यवस्थापनासाठी आवश्यक असणारी कालवा निरीक्षक, मोजणीदार, दप्तरी कारकुन ही पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्हा हा मा.राज्यपालांनी निर्धारीत केलेल्या सिचनांच्या अनुशेषातंर्गतचा जिल्हा असतांना जिल्हयात बॅरेजेस, ल.पा.योजना, मध्यम व लघु प्रकल्प, को.प. बंधारे अशी जवळपास १२५ प्रकल्प पुर्ण असुन सिंचन व्यवस्थापनामध्ये आवश्यक असणारी रिक्त पदामुळे विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाखा अभियंता,कालवा निरिक्षक, मोजणीदार, दप्तरी कारकुनाची रिक्त पदे भरण्यासंदर्भात वाशिम जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीने दिनांक ०५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०५-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

वाशिम जिल्हयातील रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | एकूण मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे | रिक्त पदांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | शाखा अभियंता | ७१ | ५८ | १३ | १६% |
| २ | कालवा निरिक्षक | ४८ | १२ | ३६ | ७५% |
| ३ | मोजणीदार | २४ | ५ | १९ | ९१% |
| ४ | दप्तरी कारकून | १६ | ४ | १२ | ७५% |

(२) ज्या ठिकाणी कर्मचारी वर्ग कमी आहे त्याठिकाणी कंत्राटपध्दतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतच्या सूचना शासनाने क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत.

(३) होय.

(४) सदर निवेदनानुषंगाने मुख्य अभियंता (विप्र) जलसंपदा विभाग अमरावती यांना दि.०७.०६.२०१६ अन्वये शाखा अभियंता संवर्गाची पदे भरण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सरळसेवेने कनिष्ठ अभियंता संवर्गातील पदासाठी घेण्यात आलेल्या स्पर्धा परिक्षानुसार मार्च २०१७ मध्ये वाशिम जिल्हयाकरीता २८ पदांना नियुक्ती देण्यात आली आहे. इतर पदे भरणेबाबत परिमंडळीय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

## मुद्रा योजनेचे कर्ज बँकाकडून वाटप होत नसल्याबाबत

**(४८) ८१६८७ (०२-०१-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील मुद्रा योजनेअंतर्गत अंतर्भुत असलेल्या बँकांकडून सुशिक्षीत बेरोजगारांना रु.५० हजार ते रु.५ लाखापर्यंत व रु.५ लाख ते १० लाखापर्यंत शिशु या हेड खाली कर्ज वाटप करणे बंधनकारक असताना सुध्दा बऱ्याच बँका बेरोजगारांना कर्ज प्रकरणे मंजूर करत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ च्या चौथ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित बँकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

बँका योग्य कर्ज प्रकरणांना कर्ज वाटप करत आहेत. बँकांमार्फत मुद्रा योजनेंतर्गत १५ जानेवारी २०१७ पर्यंत एकूण ७,५३१ कर्ज प्रकरणांना खालीलप्रमाणे रुपये १०९.७२ कोटी इतके कर्ज वाटप झाले आहे.

(i) शिशु गट - ४३२१ कर्ज प्रकरणांना रु.१६४१.४८ लक्ष

(ii) किशोर गट - ३००१ कर्ज प्रकरणांना रु.७६८७.७३ लक्ष

(iii) तरुण गट - २०९ कर्ज प्रकरणांना रु.१६४२.४१ लक्ष

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टेमघर धरणाचे कार्यकारी अभियंता पद रिक्त असल्याबाबत

**(४९) ८३०७३ (०२-०१-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेमघर धरणाचे कार्यकारी अभियंता पद गेल्या सात महिन्यापासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे गळती सुरु असलेल्या या धरणाच्या देखभाल आणि दुरुस्तीचे काम अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने रिक्त पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०५-२०१७) :** (१) भामा आसखेड धरण विभाग, पुणे या विभागाचे कार्यकारी अभियंता हे पद दिनांक १८.०८.२०१६ पासून रिक्त होते.
(२) हे खरे नाही.

धरणाच्या गळती प्रतिबंधक कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली आहे. काम प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) जलसंपदा विभाग, शासन आदेश, दि.२०.०३.२०१७ अन्वये कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील श्री.सु.व.प्रदक्षिणे यांची सदर रिक्त पदी नियुक्ती केली असून, ते दि.०१.०४.२०१७ (म.पू.) पासून कार्यरत आहेत.

---

**राज्याने घेतलेल्या कर्जाचे विनियोग योग्यप्रकारे करण्याबाबत**

**(५०) ८३७८५ (०२-०१-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या महालेखापाल यांनी राज्याचे कर्ज ३ लाख १९ हजार कोटींवरून ३ लाख ५१ हजार कोटी झाल्याचे स्पष्ट केले व त्याचसोबत जवळ जवळ ५०% निधी हा मार्च महिन्यात खर्च होतो असे देखील अहवालात नमूद केले आहे, शासनाने घेतलेल्या कर्जाचे विनियोग योग्यप्रकारे करत नसल्याचे शेरे महालेखापालांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्जाची रक्कम फक्त भांडवली कामांमध्ये खर्च केली जावी यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०६-२०१७) :** (१), (२) व (३) महालेखापाल मुंबई यांच्या सन २०१५-१६ च्या लेख्यावरील ओझरता दृष्टीक्षेप या प्रकाशनामध्ये प्रसिध्द आकडेवारीनुसार राज्य शासनावरील सन २०१५-१६ मध्ये कर्ज व दायित्व रु. ३,५१,३४१ कोटी दर्शविण्यात आले आहे.

हे खरे आहे. तथापि महालेखापाल यांचे सन २०१५-१६ च्या वित्तीय लेख्यानुसार राज्य शासनावरील प्रत्यक्ष (Actual) दायित्व रु. ३,२४,२०१ कोटी अधिक बिन व्याजी ठेवी रू. २७,१४० कोटी आहे.राज्य शासनाच्या प्रचलित कार्यपध्दतीत बिन व्याजी ठेवींची परिगणना दायित्वामध्ये करण्यात येत नाही.

राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरणास अनुसरून राज्यास प्राप्त होणारा महसूल लक्षात घेता, राज्य शासनाकडून राज्याच्या विविध विकास कामांसाठी कर्जाची उभारणी करण्यात येते व सदर रक्कमेचा विनियोग राज्याच्या विविध विकास कामासाठीच (भांडवली खर्च) करण्यात येतो तसेच प्रशासकीय विभागांनी उपलब्ध करून दिलेला निधी वेळेत खर्च करावा वित्तीय शिस्तीचे पालन व्हावे तसेच विकासात्मक कामांची प्रगती राखली जावी यासाठी

विभागांनी खर्चाचे प्रमाण योग्य रित्या नियोजित करून याबाबतचा आढावा प्रशासकीय विभागांनी सचिव स्तरावर घ्यावा व मार्च अखेरीस प्रमाणाबाहेर (Rush of Expenditure) खर्च होणार नाही. याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना वेळोवेळी सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.